**वाचले :**

१) महाराष्ट्र शासन- सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र:बीसीसी २०१८/ प्र.क्र.३०८/१६-ब, दिनांक २१ डिसेंबर २०१९

२) महाराष्ट्र शासन - सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्रमांक:बीसीसी२०१८/ प्र.क्र.३०८/१६-ब, दिनांक २७ नोव्हेंबर २०२०

३) महाराष्ट्र शासन - सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्रमांक:बीसीसी२०१८/ प्र.क्र.३०८/१६-ब, दिनांक २८ ऑक्टोबर २०२१

४) महाराष्ट्र शासन - सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्रमांक:बीसीसी २०१९/प्र.क्र.५८१ ए/१६-ब, दिनांक १४ डिसेंबर २०२२

५) आदेश क्र.प्रशा/६/कावि/३२९/२०१०, दि.०८/०६/२०१०

६) श्री.कांबळे पृथ्वीराज वसंत यांचा दि.०९/१०/२०२३ व दि.०१/१२/२०२३ रोजीचा मनपा सेवेत अधिसंख्य पदावर रूजू करुन घेणेबाबतचे अर्ज.

७) महाराष्ट्र शासन - नगर विकास विभागाकडील पत्र क्र:पीसीसी २०२४/प्र.क्र.४८/नवि-२२,दि.१४ मे २०२४

८) मा.आयुक्त, यांचा दिनांक ०८/०७/२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,<br>
पिंपरी १८,सामान्य प्रशासन विभाग<br>
क्र.सा.प्र.वि/३/कावि/१०४८/२०२४<br>
दिनांक :०९/०७/२०२४

**विषय : अनुसचित जमाती प्रवर्गातून नियुक्त झालेल्या तथापि जात वैधता प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या आस्थापनेवरील गट- क संवर्गातील कर्मचारी यांच्याकरिता अधिसंख्य पदे निर्माण करण्याबाबत...**

**श्री.कांबळे पृथ्वीराज वसंत, मुख्य आरोग्य निरीक्षक**

आदेश

ज्याअर्थी, **श्री.कांबळे पृथ्वीराज वसंत** यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिका अस्थापनेवर **आरोग्य निरीक्षक** या पदावर अनुसूचित जमाती या प्रवर्गातून इकडील आदेश क्र.प्रशा/२/कावि/१२४१/१९९२, दि.०१/०९/१९९२ अन्वये नियुक्ती देण्यात आलेली होती.

आणि ज्याअर्थी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समिती कोकण विभाग, ठाणे यांचे दिनांक ०१/०२/२०१० चे आदेश, खातेनिहाय चौकशीतील दोषसिध्दी, व श्री.कांबळे पृथ्वीराज वसंत यांचे जात प्रमाणपत्र, पडताळणी समिती, पुणे यांनी अवैध ठरविल्यामुळे मे.उच्च न्यायालय, मुंबई येथील दाखल रिट पिटीशन क्रमांक ७७४०/२००८ मध्ये मे.उच्च न्यायालयाने दि.२९/०४/२०१० चे निर्णयान्वये महापालिकेस दिलेले आदेशानुसार श्री.कांबळे पृथ्वीराज वसंत, मुख्य आरोग्य निरीक्षक यांना दिनांक ०८/०६/२०१० चे आदेशान्वये महापालिका सेवेतून बडतर्फ करण्यात आलेले आहे.

आणि ज्याअर्थी महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र:बीसीसी२०१८/प्र.क्र.३०८/ १६-ब, दिनांक २१ डिसेंबर २०१९ अन्वये अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरल्याच्या कारणास्तव यापुर्वी सेवा समाप्त करण्यात आलेल्या अधिकारी व कर्मचा-यांना, वित्त विभागाचा शासन निर्णय क्र.असंक-१००१/प्र.क्र.२९/२००१/वित्तीय सुधारणा, दिनांक १०/०९/२००१ अन्वये विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार अधिसंख्य पदे निर्माण करून त्यांना तात्पुरत्या स्वरूपात ११ महिन्यांकरीता किंवा ते सेवेत असते तर ते ज्या दिनांकाला सेवा निवृत्त झाले असते त्या दिनांकापर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत अधिसंख्य पदावर नेमणूक देण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत.

आणि ज्याअर्थी, श्री.कांबळे यांच्याबाबत उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता दि. २१ डिसेंबर, २०१९ च्या शासन निर्णयातील तरतुदी नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत अधिसंख्य पदावर रुजू करुन घ्यावे किंवा कसे? तसेच रुजू करुन घेताना कोणत्या पदावर रुजू करुन घ्यावे? याबाबत मा.शासनाचे मार्गदर्शन मागविण्यात आले होते. त्याअनुषंगाने वाचले क्र.७ अन्वये सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २१ डिसेंबर, २०१९ च्या शासन निर्णयातील

तरतुदींनुसार श्री.पृथ्वीराज वसंत कांबळे, मुख्य आरोग्य निरीक्षक यांना अधिसंख्य पदावर नियुक्त देण्याबाबत कळविले आहे.

त्याअर्थी, **श्री.कांबळे पृथ्वीराज वसंत** यांचे अनुसूचित जमाती पडताळणी समिती, पुणे यांनी अवैध ठरविल्याने त्यांच्या सेवा वर्ग करण्यासाठी महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचे दिनांक २१ डिसेंबर २०१९ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार **सार्वजनिक आरोग्य सेवा गट 'क'** संवर्गातील **श्री.कांबळे पृथ्वीराज वसंत (मुख्य आरोग्य निरीक्षक)** यांच्याकरीता खालील प्रमाणे अधिसंख्य पद महापालिका आस्थापनेवर निर्माण करण्यात येत आहे.

| अ.क्र | कर्मचा-यांचे नावं | संबंधित कर्मचा-याकरीता निर्माण करण्यात येणा-या अधिसंख्य पदाचे पदनाम | गट | मुळ नियुक्तीचा दिनांक | सेवा समाप्त करण्यात आल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.कांबळे पृथ्वीराज वसंत | मुख्य आरोग्य निरिक्षक | गट-क | ०७.०९.१९९२ | ०८.०६.२०१० |

सदर अधिसंख्य पदावर सेवा वर्ग करण्यात येणा-या कर्मचा-यांसाठी निर्माण करण्यात आलेले अधिसंख्य पद तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्याकरीता किंवा ते सेवेत राहिले असते तर ते ज्या दिनांकाला सेवानिवृत्त झाले असते त्या दिनांकापर्यंत, यापैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत सदर अधिसंख्य पद अस्तित्वात राहील.

सदर पदाच्या वेतनावर येणारा खर्च हा संबंधित कर्मचारी कर्मचारी ज्या विभागात कार्यरत राहील त्या विभागाच्या वेतनासंबंधीच्या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व त्या वित्तीय वर्षाच्या मंजूर तरतुदीमधून भागविण्यात यावा.

**श्री.कांबळे पृथ्वीराज वसंत** यांना ते सेवेत राहिले असते तर त्यांना जेवढे वेतन मिळाले असते तेवढे दरमहा वेतन त्यांना पुढील आदेश होईपर्यंत देण्यात येईल. तसेच सदर पदावर देण्यात आलेली नियुक्ती ही खालील अटी व शर्तीवर करण्यात आली असून, सेवा कालावधीत या अटी व शर्ती त्यांचेवर बंधनकारक राहतील.

**अटी व शर्ती :-**

१. सदरची नियुक्ती ही महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र:बीसीसी २०१८/ प्र.क्र.३०८/१६-ब, दिनांक २१ डिसेंबर २०१९ अन्वये देण्यात आलेली असल्याने त्यामधील सर्व मार्गदर्शन/नियम बंधनकारक राहतील.

२. सेवा कालावधी हा केवळ ११ महिन्यांचा असणार आहे. याची नोंद घेण्यात यावी. सदरची नेमणूक पुर्णपणे तात्पुरत्या हंगामी स्वरुपाची आहे. त्यामुळे कोणत्याही कायमपदी नेमणुकीचा हक्क राहणार नाही. व तशी आस्थापनेवर वेतनश्रेणीत नियुक्ती मिळावी म्हणून निवेदन सादर करता येणार नाही. किंवा तसा बाह्य दबाव आणता येणार नाही. कोणत्याही मे.न्यायालयात दावा दाखल करता येणार नाही. याकरिता सोबतचे विहित नमुन्यात हमीपत्र स्वाक्षरी करुन सादर करावे लागेल.याबाबत शासन स्तरावरुन जे मार्गदर्शन प्राप्त होईल त्याप्रमाणे पुढील कारवाई प्रस्तावित केली जाईल.

३. नियुक्ती आदेश मिळालेच्या तारखेपासून ७ दिवसांच्या कालावधीत महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागात रुजू / हजर व्हावे लागेल.संगणक कक्ष ( सामान्य प्रशासन) यांनी संगणक क्रमांकाबाबत कार्यवाही करुन त्यांचे वैयक्तिक तपशिलांची संगणकावर नोंद घ्यावी. मुदतीत हजर न झाल्यास आपणांस नोकरीची आवश्यकता नाही, असे गृहित धरुन सदरची नियुक्ती रद्द करण्यात येईल व मुदतीनंतर कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

४. महानगरपालिका सेवेत रुजू / हजर होताना शाळा सोडल्याचा दाखला, शैक्षणिक अर्हतेचे सर्व दाखले, संगणक अर्हता धारण केलेबाबतचे दाखले, पि.चि.मनपाने प्रथम नियुक्ती दिली आहे त्या नेमणूक आदेशाची प्रत, स्वत:चे जात प्रमाणपत्र, जात वैधता समितीने जात पडताळणीबाबत दिलेल्या पत्र / आदेशाची प्रत तसेच अन्य आवश्यक कागदपत्रे यांची मूळ प्रत व सर्व कागदपत्रांच्या प्रत्येकी एक साक्षांकीत झेरॉक्स सत्य प्रती सामान्य प्रशासन विभागास सादर करावी लागतील.

५. महानगरपालिका सेवेत रुजू / हजर होताना पॅन कार्ड, आधार कार्ड, बँक पासबुक सोबत आणावे, त्याशिवाय रुजू / हजर करुन घेतले जाणार नाही.

६. महानगरपालिका सेवेत हजर होताना नव्याने काढलेल्या आपल्या छायाचित्राच्या ( फोटोच्या ) शासकीय राजपत्रित अधिका-याने/नोटरी यांनी प्रमाणित केलेल्या दोन प्रती सादर कराव्या लागतील, त्याशिवाय रुजू / हजर करुन घेतले जाणार नाही.

७. महापालिकेने स्वीकारलेले सेवानियम अथवा सेवानियमाबाबत केलेले उपविधी किंवा सध्या अस्तित्वात असलेले सेवानियम किंवा भविष्यकाळात अमलात येणारे सेवा नियम आपल्यावर बंधनकारक राहतील.

८. आदेशामध्ये नमुद ११ महिन्याच्या कालावधीत कामकाज असमाधानकारक आढळल्यास, विनापरवाना गैरहजर राहिल्यास, गैरवर्तणूक आढळल्यास, नेमून दिलेल्या कामात टाळाटाळ केल्यास, उध्दटपणाची वर्तणूक केल्यास, कोणत्याही प्रकारची पूर्वसूचना न देता केंव्हाही कामावरुन कमी केले जाईल.

९. आपण दिलेली माहिती व कागदपत्रे खोटी आहे असे निदर्शनास आल्यास व तशी खात्री झाल्यास कोणत्याही प्रकारची पूर्व कल्पना न देता व चौकशी न करता अथवा नोटीस न देता महानगरपालिका सेवेतून त्वरीत कमी केले जाईल व त्याबाबत कोणत्याही स्वरुपाची तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

१०. महाराष्ट्र शासन- सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र:बीसीसी २०१९/प्र.क्र.५८१ ए/१६-ब, दि.१४ डिसेंबर २०२२ नुसार अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यामुळे ज्या शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांना अधिसंख्य पदावर वर्ग केले आहे अशा अधिसंख्य पदावरील अधिकारी व कर्मचारी यांना सेवा विषयक तसेच सेवा निवृत्तीचे लाभ अनुज्ञेय ठरतील मात्र यामध्ये पदोन्नती व अनुकंपा धोरण याचा लाभ मिळणार नाही.

११. दिनांक १४ डिसेंबर २०२२ चे शासन निर्णयान्वये अधिसंख्य पदावर कार्यरत शासकीय अधिकारी व कर्मचारी यांना मानवतावादी दृष्टीकोनातून व त्यांनी केलेल्या सेवेचा विचार करुन १ दिवसाचा तांत्रिक खंड देवून पुन्हा ११ महिन्याच्या कालावधीकरीता त्यांच्या सेवा सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यत सुरु ठेवाव्यात.

१२. सामान्य प्रशासन विभागाने आदेश क्र.साप्रवि/५/कावि/१०३/२०२३, दि.३/३/२०२३ नुसार महानगरपालिकेतील अधिसंख्य पदावर नेमणूक दिलेल्या अधिकारी/कर्मचा-यांना सेवा विषयक/ सेवा निवृत्ती विषयक लाभ देणेकामी विभागस्तरावर पुढील कार्यवाही करावी.

१३. शासन स्तरावरुन वेळोवेळी प्राप्त होणारे आदेश सदर कर्मचा-यांवर बंधनकारक राहतील.

१४. भारतीय घटनेशी एकनिष्ठ राहण्याची शपथ घ्यावी लागेल.

प्रस्तुत आदेशाची नोंद संबंधीत कर्मचा-यांचे सेवानोंद पुस्तकात घेणेत यावी.

**सही/-**
**(शेखर सिंह)**
**आयुक्त,**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रति,

**श्री.कांबळे पृथ्वीराज वसंत**
सर्व्हे नं.१२३, निसर्ग हौ सोसायटी,
शिवले विठभट्टी जवळ, वाल्हेकरवाडी, गुरुद्वारा रोड,
चिंचवडगाव, पुणे, महाराष्ट्र -४११०३३

प्रत-

१. लेखा विभाग २. लेखा परिक्षण विभाग ३. सामान्य प्रशासन टेबल क्रमांक - ७,१०,१२,१४. संगणक कक्ष.
४. संबंधित विभाग प्रमुख-
२/-उक्त आदेशात नमूद केलेप्रमाणे कार्यवाहीसाठी.

उप आयुक्त
सामान्य प्रशासन विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका